ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-II March - April 2021

# भारतातील प्रौढ शिक्षणाची संकल्पना

अभिषेक आनंदराव वाघ

भारतातील शिक्षणाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, भारतामध्ये निरक्षरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. ती कमी करण्यासाठी किंवा साक्षरतेच्या प्रचारासाठी, प्रौढ शिक्षणाच्या आवश्यकते साठी खास वकिली करण्याची गरज नाही, कारण की जॉर्ज अँडरसन यांनी असे म्हटले आहे की, 'आजच्या परिस्थितीत प्रौढ शिक्षणाची प्रगती करण्यात येणारे अपयश हे अपरिहार्यपणे निरक्षरता नष्ट करण्याच्या अपयशावर फलद्रूप होणारे आहे'.[१]

प्रसिद्ध मानसशास्त्र डॉ. इ.एल. थौर्जडाइक प्रयोग केल्यानंतर असे लिहितात की, जर व्यक्तीने वयाच्या १५ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांचे शिक्षक उत्तम प्रकारच्या अध्यापन पद्धतीने अध्यापन करून त्यांचा निकाल चांगला देत असतील, तर वरच्या वयोगटातील नागरिक शिक्षण घ्यायला अधिक लवकर प्रतिसाद देतात. ५० पेक्षा खालच्या वयाच्या स्त्री-पुरुषाला शिकण्याच्या प्रयत्नातून निरुत्साही करू नये. त्यामुळे ते शिक्षणापासून वंचित होणार नाहीत.[२]

CC BY

Aarhat Publication & Aarhat Journalsis licensed Based on a work at http://www.aarhat.com/eiirj/

डॉ. लिंग यांचे रोड शिक्षणाविषयी असे मत आहे की, ज्या लोकांना लिहीता- वाचता येत नाही अशा प्रचंड समुदायापर्यंत पोहोचायचे कसे हा प्रश्न आहे. प्रथम हा लढा शहरात सुरू करायला पाहिजे. प्रशासनातील उच्चपदस्थ व्यक्तीने देखील या लढ्यात भाग घ्यायला हवा. लोकांची निरक्षरता दूर करणे हे आपले कर्तव्य आहे, हे त्यांना पटले पाहिजे. तसेच गावातील शहरातील शिक्षकांना रोज शाळेच्या वेळेनंतर एखादा तास शिकविण्यास तयार केली पाहिजे. तसेच माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना देखील शाळेच्या तासानंतर आठवडाभर रोज एक तास निरक्षरांना शिकविण्यास उद्युक्त केले पाहिजे. उन्हाळ्यात आणि उघड्यावर अंगण शाळा सुरू केल्या पाहिजे. काही ठिकाणी २००, ४०० किंवा प्रौढ असणारे वर्ग आहेत आणि दोन किंवा तीन शिक्षक त्यांना सायंकाळी उघड्या जागेत चांगल्या प्रकारे शिकवू शकतात. त्यानंतर गृह शाळेत देखील प्रौढांना शिक्षण देता येते. एखाद्या कुटुंबात अनेक मोलकरणी व नोकर काम करत असतात. आपण त्या कुटुंबप्रमुख वर देखिल त्या मोलकरणींना तसेच नोकरांना साक्षर करण्याची जबाबदारी देऊ शकतो. तसेच काही फिरत्या शिक्षकांच्या माध्यमातून देखील निरक्षरांना साक्षर करता येते. अशाप्रकारे निरक्षरांपर्यंत पोहोचण्याचा अनेक मार्ग आहेत.

**प्रौढ शिक्षणाची संकल्पना :**

निरक्षरता आणि आज्ञान अशा गोष्टी आहे ज्या व्यक्तीच्या, कुटुंबाच्या, समाजाच्या तसेच राष्ट्राच्या विकासाच्या अडथळे निर्माण करत असतात. सर्वसाधारणपणे अभ्यास केला असता असे लक्षात येते की, जी व्यक्ती निरक्षर आहे तिचा व ज्या राष्ट्रात निरक्षर जनता आहे त्या राष्ट्राचा विकास कधीही घडून येत नाही. जर व्यक्तीचा म्हणजेच निरक्षर व्यक्तीचा विकास करायचा असेल तर यासाठी प्रौढ शिक्षणाची आवश्यकता आहे.

प्रौढ शिक्षण:

प्रौढ शिक्षण म्हणजे, "प्रौढांना लिहिता-वाचता येणे तसेच सोपे हिशोब करता येणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय"[३], असे आपल्या भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात प्रामुख्याने समजले जात असे. वरील व्याख्येवरून आपल्याला प्रत्येक प्रौढाला अक्षर ज्ञान असले पाहिजे. त्याला सोपी पुस्तके वाचता आली पाहिजेत.

भारतासारख्या विकसनशील देशात प्रौढ शिक्षण आवश्यक आहे. ज्याचे वय २५ ते ३० वर्ष असते. अशा प्रौढांना आवश्यकतेप्रमाणे शिक्षण दिले जाते. राष्ट्राच्या विकासात समाजातील सर्वांचा सहभाग असावा लागतो. त्यासाठी प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमात कौशल्यवृत्ती, गरिबी निवारण, राष्ट्रीय एकात्मता या बाबींचा समावेश असावा.[४]

चाकोरीबाहेरील शिक्षणाचा वापर याकरिता केला जातो. धंदे शिक्षण, हस्तकौशल्य, शाळाबाह्य प्रौढांना शिकविले जाते. प्रौढ शिक्षण केंद्रात व्यक्तिमत्व विकासाकरिता व उत्पादक व्यवसायाकरिता शिक्षण दिले जाते. या खेरीज इंग्रजी भाषा शिकण्याकरीता मंत्रालयाने काही केंद्र स्थापित केली आहेत. प्रकारे देशात 87% साक्षरता आहे.[५]

प्रौढ शिक्षणामध्ये औपचारिक शिक्षणाशिवाय इतर अनौपचारिक शिक्षणाचा वापर केला जातो. त्यामुळे प्रौढांना शिक्षणाविषयी आवड निर्माण होते व त्यांना शिक्षण घेण्यात आनंद निर्माण होतो. तसेच विविध हस्तकौशल्ये शिकल्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. परिणामी त्यांचे व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत होते.

**प्रौढ शिक्षणाची व्यापक संकल्पना :**

"१९४७ साली भारत स्वतंत्र झाला व आपण सार्वभौम झाली. भारताची लिखित घटना तयार झाली आणि आपल्या भारतात आपल्या प्रतिनिधीचे सरकार केंद्रस्थानी व सर्व प्रांतात आले. पारतंत्र्यातील प्रौढ शिक्षणाची संकल्पना पारतंत्र्यात बरोबर मागे पडली आणि त्यात स्वतंत्र सार्वभौम भारतात प्रौढ शिक्षणाची संकल्पना नव्याने निर्माण झाली."[६]

१९६२ मध्ये भरलेल्या जागतिक साक्षरता परिषदेने व सामाजिक परिषद यांनी रोड शिक्षणाची व्याख्या खालीलप्रमाणे केली. "प्रौढ शिक्षण म्हणजे प्रौढांना रोजचे वर्तमानपत्र वाचता येणे किंवा पाच वर्षे शालेय शिक्षण घेतलेल्या मुलाइतके ज्ञान म्हणजेच इयत्ता पाचवी पास झालेल्या मुला इतके ज्ञान प्रत्येक प्रौढ़ाला येणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय." [७]अशी व्यापक व्याख्या केली आहे. वरील व्याख्येचा अभ्यास केला असता, प्रौढ़ाला म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला विविध विषयाचे ज्ञान मिळाले पाहिजे असा होतो.

युनेस्को तर्फे १९६५ मध्ये इराणची राजधानी तेहरान येथे शिक्षणमंत्र्यांची एक जागतिक परिषद भरविण्यात आली होती. तेव्हा साक्षरतेविषयी प्रौढ शिक्षणाविषयी विचार विनिमय चांगल्या प्रकारे होऊन प्रौढ शिक्षणाची चांगली संकल्पना पुढे आली. प्रौढ शिक्षण म्हणजे, "प्रौढांना केवळ साक्षर करणे हे अंतिम उद्दिष्ट नाही तर या साक्षरतेच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक आणि नागरिकत्वाची नवी जबाबदारी भूमिका घेण्यासाठी प्रत्येक प्रौढ व्यक्तीला तयार करणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय."[८]

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-II March - April 2021

**प्रौढ शिक्षणाचे महत्व:**

प्रौढ शिक्षणाचे महत्त्व तीन दृष्टिकोनातून आहे. "पहिला दृष्टिकोन म्हणजे प्रौढ व्यक्तीच्या दृष्टीने प्रौढ शिक्षणाचे महत्त्व, दुसरा दृष्टिकोन म्हणजे सामाजिक दृष्टिकोनातून प्रौढ शिक्षणाचे महत्त्व व तिसरा दृष्टिकोन म्हणजे राष्ट्रीय दृष्टीने शिक्षणाचे महत्त्व" याप्रमाणे प्रौढ शिक्षणाचे महत्त्व सांगता येईल.

प्रौढ शिक्षणामुळे प्रत्येक निरक्षर प्रौढ साक्षर होतो. त्याला लिहिता, वाचता येते. प्रौढ शिक्षणामुळे प्रौढ स्वावलंबी होऊ शकतात. तसेच प्रत्येक प्रौढांना अर्थोत्पादन क्षमता आणि त्यामुळे प्रौढांची आर्थिक स्थिती सुधारण्यास चांगली मदत होऊ शकते. प्रौढ शिक्षण योजनेअंतर्गत महाराष्ट्रामध्ये १९५९ साली ग्रामशिक्षण मोहिमेला सुरुवात झाली. महाराष्ट्र राज्यामध्ये २५ जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर या मोहिमेला सुरुवात झाली. १९७७ मध्ये शेतकऱ्यांसाठी कार्यात्मक साक्षरतेचा प्रकल्प राबविण्यात आला. ४०० प्रकल्प प्रत्येक राज्यात राबवण्यात आले. यापैकी १४० प्रकल्प पूर्णत्वास गेलेले होते. "भारतामध्ये राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम २ ऑक्टोबर १९७८ ला सुरू करण्यात आला. यामध्ये मुख्य भर कार्यात्मक साक्षरता आणि जाणीव जागृती यावर देण्यात आला होता. हा कार्यक्रम १५ ते ३५ वयोगटातील प्रौढांसाठी राबविण्यात आलेला होता. वाचन-लेखन याबरोबरच सामाजिक जाणीव जागृती आणि एकूणच जीवनस्तर उंचावणे यावर भर देण्यात आलेला होता."[९]

**भारतातील प्रौढ शिक्षणाचा आढावा :**

भारतातील प्रौढ शिक्षणाची माहिती दोन भागातून घेणे आवश्यक ठरते. पहिला भाग स्वातंत्र्यपूर्व काळातील असून नंतर चा भाग स्वातंत्र्योत्तर काळातील आहे

**१) स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रौढ शिक्षण:**

स्वातंत्र्यपूर्व काळात निरक्षर प्रौढांना साक्षर करणे म्हणजे प्रौढशिक्षण असेच मानले जात होते. प्रौढांना अक्षरज्ञान, अंकज्ञान आले पाहिजे. त्यांना सोपी पुस्तके वाचता आली पाहिजेत. गरजेपुरते लिहिता आले पाहिजे. व्यवहारातील सोपी सोपी उदाहरणे व हिशोब करता आले पाहिजे. अशी अपेक्षा प्रौढ शिक्षणात होती. या व्याख्येनुसार

- औपचारिक शिक्षणातून मिळणाऱ्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा काही भाग हा शिकवायचा आणि
- त्यांच्याकडून प्रारंभिक स्वरूपाच्या कमीत कमी ज्ञानाची अपेक्षा करायची असे दिसते. ही व्याख्या फारच मर्यादित स्वरूपाची होती.

वरील व्याख्येत इ.स. १९३७ झाली बदल करण्यात आला. असा बदल करण्याचे कारण की, त्यावेळी देशात बऱ्याच प्रांतात काँग्रेसची सरकारे सत्तेवर आलेली होती. ब्रिटीशांनी भारतीयांना काही मर्यादित स्वरुपात मतदानाचा हक्क दिलेला होता व त्याची मर्यादा क्रमाक्रमाने विस्तारली जाणार होती व भविष्यकाळात आणखी काही हक्क मिळू शकतील व त्यांचा वापर लोकशाही पद्धतीने करावा लागेल. त्यामुळे प्रशिक्षणाची नवीन व्याख्या पुढीलप्रमाणे तयार करण्यात आली.

"निरक्षर प्रौढांना साक्षरतेचे निकष देणारे आणि त्यांच्या ठिकाणी चांगल्या नागरिकाची समता निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे शिक्षण म्हणजे प्रौढ शिक्षण होय."[१०] अशी प्रौढ शिक्षणाची नवीन व व्यापक स्वरूपाची व्याख्या करण्यात आली.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-II March - April 2021

**२) स्वातंत्र्योत्तर काळातील प्रौढ शिक्षण :**

भारत देश इ.स. १९४७ साली स्वतंत्र झाला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील लोकांना वेगळे व स्वतंत्र राष्ट्रातील नागरिक म्हणून नवी भूमिका पार पाडायची होती. त्याप्रमाणे इ.स. १९४९ साली मध्यवर्ती शिक्षण सल्लागार समितीने एक समिती नेमली. त्या समितीने आपला अहवाल तयार केला. त्या अहवालानुसार प्रौढ शिक्षणाचे स्वरूप बदलले गेले.

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा प्रौढ शिक्षणाची संकल्पना वाचन, लेखन व अंकगणिताचे शिक्षण यापुरतीच मर्यादित होती. प्रौढ शिक्षण समितीने प्रौढ शिक्षणाची व्यापक संकल्पना मांडली. प्रौढांचा जीवनस्तर सुधारणे व राष्ट्रीय विकासात सहभाग घेण्यास त्यांना समर्थन करणारे शिक्षण अशा प्रौढ शिक्षकक्रमाचे संकल्पना मांडली आहे. पुढील सर्व आयोग/ समित्या व इतर अहवालातून हीच संकल्पना मान्य केलेली दिसते.

प्रौढ शिक्षणाची व्यापक उद्दिष्टे मांडली गेलेली आहेत. प्रौढ शिक्षणा समितीने प्रौढांचा सामाजिक आर्थिक व आरोग्यविषयक विकास व्हावा असे सर्वसामान्य उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवलेले दिसते.

प्रौढ शिक्षणाची कोणतीही ठोस योजना प्रौढ शिक्षण समितीने मांडलेली नाही. प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रम सुचविताना कोठारी आयोगाने निवडक व सर्वस्पर्शी अशा दोन्ही प्रकारच्या कार्यक्रमावर भर दिला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सार्वत्रिक साक्षरता कार्यक्रमावरच भर आहे. प्रौढा शिक्षणासाठी प्रकल्प दृष्टिकोन धोरणाने स्वीकारला आहे. या कार्यक्रमांमध्ये शैक्षणिक सेवाभावी संस्थांचा सहभाग असावा, असे दोन्हीमध्ये म्हटले आहे. प्रत्यक्ष शैक्षणिक संस्थेने एक तरी साक्षरता वर्ग चालवावा, ही कोठारी आयोगाची शिफारस अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर काळातील प्रौढ शिक्षणाची संकल्पना मांडली आहे.

**सारांश :**

भारताची निरक्षरांची संख्या कमी करण्यासाठी किंवा साक्षरता वाढविण्यासाठी प्रौढ शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्या व्यक्तीचे प्राथमिक शिक्षण जर चांगल्या प्रकारे झालेले असेल तर त्याचे उच्च शिक्षण देखील चांगल्या प्रकारचे होण्यास उपयोग होतो.

वय वर्षे ५० वर्षांपेक्षा कमी वयाच्या स्त्री-पुरुषास शिक्षण घेण्यास प्रोत्साहन द्यावे त्यांना कधीही निरुत्साही करू नये. प्रौढ शिक्षणाची सुरुवात सर्वप्रथम शहरात व नंतर ग्रामीण भागात अशी करावी व त्याला राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप द्यावे.

शिक्षणासाठी शाळेतील शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, वरच्या वर्गातील विद्यार्थी, अधिकारी, कुटुंबप्रमुख यांची मदत घ्यावी म्हणजे प्रौढ शिक्षण चळवळ यशस्वी होईल. राष्ट्राचा विकास, व्यक्तीचा, सामाजाचा, कुटुंबाचा विकास करण्यासाठी प्रौढ शिक्षणाची अत्यंत गरज आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात प्रौढ शिक्षण म्हणजे प्रौढांना लिहिता-वाचता येणे, तसेच सोपे हिशोब करता येणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय. म्हणजेच प्रत्येक प्रौढाला अक्षर ज्ञान असायला पाहिजे, सोपी पुस्तके वाचता आली पाहिजेत.

राष्ट्राच्या विकासात ज्या व्यक्तीचे वय २५ ते ५० वर्ष असते. त्यांचा वाटा मोठा असतो. त्यामुळे जर राष्ट्राचा विकास चांगल्या प्रकारे व्हायचा असेल तर या वयोगटातील व्यक्तींना प्रौढ शिक्षण मिळायला हवे.

प्रौढ शिक्षण कार्यक्रमामध्ये कौशल्यवृत्ती, गरिबी निवारण, राष्ट्रीय एकात्मता या बाबींचा समावेश असायला हवा. त्यामुळे व्यक्तीचा व्यक्तिमत्व विकास होतो. प्रौढ शिक्षण कार्यक्रमामध्ये अनौपचारिक शिक्षण

दिले जाते. प्रौढांना व्यवसाय शिक्षण, धंदे शिक्षण, हस्तकौशल्य शिक्षण दिले जाते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खऱ्या अर्थाने प्रौढ शिक्षणाची संकल्पना व्यापक प्रमाणात समोर आली.

जागतिक साक्षरता परिषदेने व सामाजिक परिषदेने प्रौढ शिक्षणाची व्याख्या "प्रौढ शिक्षण म्हणजे प्रौढाला रोजचे वर्तमानपत्र वाचता येणे किंवा पाच वर्ष शालेय शिक्षण घेतलेल्या मुलाइतके म्हणजेच इयत्ता ५वी पास झालेल्या मुलाइतके ज्ञान प्रत्येक प्रौढांला येणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय, अशी केली आहे.

युनेस्कोच्या व्याख्येवरून प्रौढ शिक्षण म्हणजे केवळ साक्षर करणे नव्हे तर साक्षरतेच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक आणि नागरिकत्वाची नवी जबाबदारी घेण्याची भूमिका पार पाडण्यासाठी तयार करणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय.

प्रौढ शिक्षणाचे महत्त्व तीन दृष्टिकोनातून सांगता येते, ते म्हणजे प्रौढ व्यक्तीच्या दृष्टीने प्रौढ शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक दृष्टिकोनातून प्रौढ शिक्षणाचे महत्त्व, राष्ट्रीय दृष्टीने प्रौढ शिक्षणाचे महत्त्व.

प्रौढ शिक्षणामुळे व्यक्ती स्वावलंबी होऊ शकतो, प्रौढ व्यक्तीला लिहिता-वाचता येते तसेच प्रौढांना अर्थप्राप्ती होते.

महाराष्ट्र मध्ये १९५९ साली ग्रामशिक्षण मोहिमेच्या माध्यमातून प्रशिक्षणाला सुरुवात झाली.
१९७७ साली शेतकऱ्यांसाठी कार्यात्मक साक्षरतेचा प्रकल्प राबविण्यात आला. ४०० प्रकल्प प्रत्येक राज्यात राबविण्यात आले. यापैकी १४० प्रकल्प पूर्णत्वास गेले होते.

भारतामध्ये राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम २ ऑक्टोबर १९७८ ला सुरू करण्यात आला. यामध्ये मुख्य भर कार्यात्मक साक्षरता आणि जाणीव जागृती या वर देण्यात आलेला होता. मुख्यतः कार्यक्रम १५ ते ३५ या वयोगटातील प्रवर्गासाठी राबवण्यात आलेला होता.

भारतातील प्रौढ शिक्षणाचा अभ्यास हा मुख्यतः दोन भागातून करता येतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रौढ शिक्षण आणि स्वातंत्र्योत्तर काळातील प्रौढ शिक्षण. अशा प्रकारे आपल्याला भारतातील प्रौढ शिक्षण चळवळीचे स्वरूप लक्षात येते.

**संदर्भसूची**

1. देशपांडे, के. ना., 'प्रौढ शिक्षण' (१९९३), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृष्ठ क्रमांक ३१.
2. उपरोक्त पृष्ठ क्रमांक ३५.
3. करंदीकर, सु. अ., 'प्रौढ शिक्षण' (१९९३), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृष्ठ क्रमांक २.
4. दळवी, म. अ., 'डायमंड सामाजिक ज्ञानकोष' (२००७), नागपूर ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर. पृष्ठ क्रमांक ४५.
5. सोहोनी, बा. वि., 'प्रौढ शिक्षण' (१९९३), नूतन प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्रमांक ६२८.
६. www.sec.educoop.net/education.in/pdf/beka/07/3/08
7. करंदीकर, सु. अ., 'प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षण'(१९९३), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृष्ठ क्रमांक ३.
8. जोगळेकर, र.अ., 'प्रौढ शिक्षण' (१९९३), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृष्ठ क्रमांक ४.
9. http://education.nic.in/ed50years/y/3t/99/3t9/c30/htm/07/3/08
10. उपरोक्त, पृष्ठ क्रमांक ५.